पुरुषोत्तमभाई चव्हाण होमिओपॅथीक महाविद्यालय, चंद्रपूर [व्दारा भारतीय ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर].

---

केंद्रीय होमिओपॅथी परिषदेने विहित केलेला बी. एच. एम. एस. पदवी अभ्यासक्रम सन १९८८-८९ या वर्षापासून सदरहू महाविद्यालयात विना अनुदान तत्वावर सुरु करण्याच्या मान्यतेबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.
शासन निर्णय क्रमांक-एमईडी/१०८७/१३०६/सीआर/२१०/८७/एमईडी-७.
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: १९: जुलै: १९८८.

वाचा:- १] सचिव, भारतीय ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ यांचे पत्र क्र. ४०४/८७/ दिनांक २५.५.१९८७.

२] उप संचालक, होमिओपॅथिक संचालनालय, मुंबई-५८ यांचे पत्र क्र. संचालो/चंद्रपूर महावि-परवानगी/१४/१९८७/होमि-१/१९८७/दि. ६ जुलै १९८७.

३] शासन निर्णय क्र. एमईडी-१०८७/१३०६/सीआर/२१०/८७/एमईडी-७/दि. १६ जुलै १९८७.

शासन निर्णय:- शासन निर्णय क्र. एमईडी-१०८७/१३०६/सीआर/२१०/८७ एमईडी-७ दिनांक १६ जुलै १९८७ या शासन निर्णयान्वये पुरुषोत्तमभाई चव्हाण, होमिओपॅथीक महाविद्यालय चंद्रपूर [व्दारा भारतीय ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर] यांना सन १९८७-८८ या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय होमिओपॅथीक परिषदेने विहीत केलेला बी. एच. एम. एस. या पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास देण्यांत आलेल्या मान्यतेसंबंधाच्या आदेशाची अंमलबजावणी प्रत्यक्षात न झाल्यामुळे सन १९८८-८९ या शैक्षणिक वर्षापासून / /विना अनुदान तत्वावर देण्यांत येत आहे. मात्र सदर मान्यता ही खालील अटींस अधीन राहून देण्यात आलेली आहे व त्यांची परिपूर्ती करणे अत्यावश्यक आहे.

अ] सदर अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना प्रवेश हा कॅटेगोरीप्रमाणे व त्यातून गुणवत्तेवरच दिला जावा.

ब] मागासवर्गीयांना प्रवेश देताना खालीलप्रमाणे आरक्षणाची ... अंमलबजावणी करावी. ... विहित आकार भरताना ... फी व्यतिरिक्त अधिक रक्कम घेतली जाणार नाही.

| अ.क्र. | वर्गवारी | आरक्षण टक्केवारी. |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती आणि अनुसूचित जाती ज्या बौध्द धर्मात धर्मांतरीत झालेल्या आहेत. | १३ |
| २. | अनुसूचित जमाती [निर्दिष्ट क्षेत्राच्या बाहेर राहणारा-जमाती] | ७ |

Received on 27-7-1988

३. विमुक्त जमाती आणि भटक्या जमाती. ४
४. इतर मागासवर्गीय जाती १०

एकूण: ३४

क] सदर महाविद्यालयाचे स्वत:चे सुसज्ज व उपकरणे इत्यादी सहप्रमाणित [illegible] रुग्णालय असावे व त्यामध्ये केंद्रीय होमिओपॅथी परिषदेने विहित केलेल्या प्रमाणांची परिपूर्ती असावी.

ड] केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्लीने विहित केलेला पूर्णवेळ अध्यापक वर्ग नेमावा.

तसेच केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्लीने विहित केलेल्या अटी पूर्ण करावयात.

इ] संस्थेने पुढील शैक्षणिक वर्ष सन १९८९-९० सुरु होण्यापूर्वी शिक्षक कर्मचारी रुग्णालय, कर्मचारी वर्ग व उपकरणे इत्यादी बाबतीत जर कांही कमतरता असेल तर ती भरून काढली पाहिजे.

ई] संस्थेचे स्वत:चे परिपूर्ण व सुसज्ज असे शरिररचना, शरिरक्रियाशास्त्र, तत्वशास्त्र व औषधी निर्माण शास्त्र इत्यादी विभाग व आवश्यक कर्मचारी वर्ग तसेच उपकरण, साहित्य इत्यादी पुढील शैक्षणिक वर्ष सन १९८९-९० सुरु होण्यापूर्वी असावेत.

ग] होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रमावर होणारा आवर्ती व अनावर्ती खर्च स्वत: संस्थेने सोसून पुरेसा निधी असावी विद्यापीठ स्तरावर शैक्षणिक दर्जावर विपरित परिणाम होणार नाही यांची संस्थेने कटाक्षाने दक्षता घ्यावी.

घ] नागपूर विद्यापीठ सदर पदवी अभ्यासक्रमासाठी जी प्रवेश क्षमता ठरवून देईल त्या प्रवेश क्षमतेचे काटेकोरपणे पालन करावे व कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन होता कामा नये अन्यथा पदवी अभ्यासक्रमाची मान्यता काढून टाकण्यात येईल.

ड] केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली यांची पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास सहमती असावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]

[श्रीमती. सु. र. नवलकर]
कक्ष अधिकारी.

प्रति,

प्रशासक [आ. प्र.] आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सहाय्यक संचालक, आयुर्वेद नागपूर.

महालेखापाल -२ महाराष्ट्र नागपूर.

प्रबंधक, नागपूर विद्यापीठ, नागपूर [पत्राव्दारे]

प्रशासक बोर्ड ऑफ एक्झामिनर्स ॲन्ड होमिओपॅथीक ॲन्ड बायोकेमिक सिस्टीम्स ऑफ मेडिसीन, मुंबई.

प्राचार्य, पुरुषोत्तमभाई पटेल होमिओपॅथीक महाविद्यालय, चंद्रपूर.

उप संचालक, होमिओपॅथी द्वारा शासकीय होमिओपॅथी रुग्णालय, विलेपार्ले [प.] मुंबई -५६.

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग [विशि-२] मंत्रालय, मुंबई-४०००३२.

सचिव, भारतीय ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ, मुल रोड, चंद्रपूर.

चिटि. १९. ७.